# फाईव्ह स्टार न्यूज

वर्ष 12 वे | जानेवारी 2025 | अंक 133 वा

MAKH
















रजि. नं. महा/23991/कोल्हापूर, एफ्/21258/कोल्हापूर

MAKH
स्था.: 04-08-2007

## मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ कागल-हातकणंगले (मॅक)

प्लॉट नं. पी-4, ए एम्-28, मॅक चौक, पंचतारांकीत औद्योगिक वसाहत, कागल-हातकणंगले, जि. कोल्हापूर-416 236.
ऑफिस फोन: (0231) 2305373. मोबा.: 8530445373, 9561445374
E-mail : presidentmakh@gmail.com | Website : **www.makhkolhapur.org**

............... We Supply ...............



## Plumbing Material
uPVC & PVC, HDEP,
Large Dia GI & MS & SS,
cPVC Pipes & Fitting etc.



## Safety Item
Safety Belts, Jackets, Shoes,
Goggles, Ear Plugs/ Mufflers,
Masks, Asbestos Hand Gloves
various type of gloves,
Safety Nets etc.

## Standard Star Couplings / Spider Couplings
Love Joy Coupling, Star Coupling



## Welding Material
Rod, Cable, Holder, Gas Cutter Hose, Welding Hand creen,
Cylinder key, Pressure Regulator, Welding Torch & accessories,
CO2 Mig Welding Wire, CO2 Contact Tip, Tip Holder, Diffuser,
CO2 Liner, Conical Nozzle.





## Fasteners
Regular/ Hardened (TVS Unbrako)
Nut Bolts, Anchor Fasteners,
Foundation Bolts Allen Bolts,
Roofing Bolts/ Screws, Al Rivets.



## Industrial Lubricants
Hydraulic Oil, Cutting Oil,
Break Oil, Food Grade Oil and
various types of Grease etc.



# KOLHAPUR TRADING PVT. LTD.

Single Source Destination For Your Multiple Requirements

Gat No. 356/2 K Five Star MIDC Road, Kagal, Kolhapur 416216
Head Office : 0231-2620315, 2625394 Fax 0231-2620019
Shop : 9921942552, 9921925885



## Packing Material
Strap Hand Tensioner & sealer, Plastic
Sutli, Packing Clips, BOPP Tape, Angle
Board,Stretch Film, Packing Patti
(Pet/PP), & Bubble Sheet etc...



## Pneumatic Fitting
Air Blow Guns, PU Pneumatic
Pipe And Its Fittings , Pneumatic
Control Valves.

## Paints
Industrial (Emlusion, PU, Epoxy,
Water Thinnable) Asian, Berger,
British make, Putty, Spray Gun ,
Paint Tray, Paint Scrapper, POP,
Spray Paint Canisters.




## Electric Item
Wires, Cables, Switches, Halogen
fitting & Tubes, Aluminium Lugs,
Shock Proof Hand gloves, GI Cable
Tray, Spark Free Light Fittings etc.





## Cleaning Items
Naphthalene Balls,Liquid Soap, Floor
Cleaner, Dust Bin, Dust Control Mop,
Floor Wiper, Hard Broom, Broom Pipe,
Washing Brush, Supli.

## Hand Tools
The complete hand tool shop
with a quality range of tools..
Make :- Taparia & Jhalani



And Further...Samruddhi Unbreakable Plastic Utensils, Roofing Sheet, Electric Hand Tools,
Construction Chemical Accessories, Cement , Adhesive Items , Abrasive Item,
Stationery Items, Industrial Lubricants

Copyright@2023-24

E-mail Id :- ktpl.kagal@ksmgroup.co.in



।। श्री जोर्तिर्लिंग प्रसन्न ।।
adh
ADhi Engineering
A Name You Can Trust...
Mr. Dhiraj B. Patil
www.adhiengineering.in
Mr. Amol D. Khambe
8087341176
ADhi Engineering
9595525363
Box Type Single Girder Eot Crane
www.adhiengineering.in
www.adhiengineering.in
Double Girder Overhead Cranes
JIB Crane
Scissor Lift Table
Single Girder E.O.T. Crane
Wire Rope Hoist
Modular Wire Rope Hoist
DSL Busbar System
Air Compressor PPR FR Blue Pipeline & Fittings
Reciprocating Air Compressor
Screw Air Compressor
Refrigerated Air Dryer
Chain Hoist
Manual Stacker
Semi Electric Stacker
Fully Electric Stacker
Electric Paper Reel Stacker
Manual Drum Tilter & Lifter
Hydraulic Beam Shifting Trolley
Pallet Truck
Dock Levellers
Single Mast Goods Lift
All Types of Elevator
Aluminium Air Pipe Line
Weight Crane Scale
Webbing Sling
Radio Remote
Push Button Pendant
Filter Element & Filter
LLDPE TUBE
Zero Air Loss Drain Valves
Tec44 Auto Drain Valves
Auto Drain Valves
Compressed Air Fittings
Magnetic Lifter
Mini Electric Hoist
Helical Gear Motor
Hydraulic Puller
Engine Crane
Construction Mini Crane
Geared Trolley
Chain Pulley Block
Electric Winch
Pneumatic-Grease Pump
Hydraulic Service Lift
Vehicle Washer
High-Bay Lights
Street Lights
LED Flood Lights
LED Tube Light
Racking System
Mr. Amol D. Khambe
9595525363
ADhi Engineering
A Name You Can Trust...
Mr. Dhiraj B. Patil
8087341176
Kiran Bungalow, M. G. Patil Chowk, Patil Galli, Unchgaon, Kolhapur-416005. Maharashtra.
email : adhiengineering8485@gmail.com, info.adhiengineering@gmail.com
Website : www.adhiengineering.in
GST No. 27ABEFA3201G1Z1

# PRECISE PEB PVT. LTD.

- Plot No. F13/6, Kagal-Hat. five star MIDC, Kolhapur, Maharashtra-416216
- Mob. 7083729009 / 9421218315
- Email : info@precisepeb.com
- Website : www.precisepeb.com
- CIN - U45309PN2019PTC184729

**PRECISE PEB** is a full service metal building construction company with the aim to provide quality steel buildings while delivering prompt personalized and professional service. If you can imagine a project, we can build the steel structure to fit your needs. From Farm Buildings to Retail Buildings, Warehouses, Garages / Workshops and specialized applications, **PRECISE PEB** has the expertise and experience to complete your project on time and on budget with civil & building.

## WE PROVIDE - END TO END

- Concept & Architectural Solution in PEB
- Site development / Design Build services (Civil works)
- Supply & installation of steel building and related work.
- Overall responsibility and interface lionising.
- Work shop facility Pullthrow & Palzma cutting machine

## PEB ADVANTAGE

- Larger span
- Faster construction & Completion
- Cost efficiency
- Economical
- Control Quality
- Strength & Stability














Sanjay D. Pendse
9422044216

Subodh S. Pendse
9922960961

KP
SINCE 1988

# KAYPEE MACHINES PVT. LTD.


PLASMA CUTTING MACHINE


GAS CUTTING MACHINE


PRESS BREAK MACHINE


LASER CUTTING MACHINE


CNC WOOD/ THERMACOL ROUTER


DOUBLE COLUMN BANDSAW


MANUAL BANDSAW


RADIAL DRILLING MACHINE


HYD./SEMI STACKER


HYD. SCISSIOR LIFT

A-249, Five Star MIDC, Kagal,
Kolhapur - 416 236

**9922960955, 0231-2305129**

kaypeemachineskop@gmail.com

**Manufacturers of-**
- **Engineering & Auto Component Precision Machining.**
- **Patterns & Dies, Jigs, Fixtures, SPM's.**
- **Spares for Various Machines & Equipments.**
- **Power Chucks Reconditioning.**
- **Machine Maintenance Services.**

Near Suresh Machinery,
Shivaji Udyamnagar, Kolhapur-416 008.

**9922960956, 9922960950**

sales.kaypeemachines@gmail.com

**Dealers in -**
- **Machines & Equipments.**
- **Material Handling Equipments.**
- **Laser Cutting Machines.**
- **Plasma Cutting Machines.**
- **Inspection Equipments.**
- **Machine Tool Accessories.**



SPORT UTILITY VEHICLES

महाराष्ट्रातील नं. 1 महिंद्रा डिलर नेटवर्क

# उन्नती मोटर्स

# गोकुळ शिरगांव

ग्राहकांच्या सोयीसाठी फेस्टिव ऑऊटलेट आता जयसिंगपूर व मुदाळ तिट्टा येथेही उपलब्ध..

सेल्स शोरुम व सर्व्हिस वर्कशॉप आठवड्याचे 7 ही दिवस ग्राहकांच्या सेवेसाठी सुरु





सुसज्ज PV शोरुम व वर्कशॉप





सुसज्ज CV शोरुम व वर्कशॉप

**UNNATI MOTORS**
Division Of Micropark Logistics Pvt Ltd

पत्यासाठी स्कॅन करा

गोकुळ शिरगांव, सुदर्शन पेट्रोल पंप जवळ, कोल्हापूर

**Mob.: 9289937560**

# DARSHAN ENTERPRISE

Mfg. PPGI Colour Coated Sheets



## Roofing Sheets



## Linear Sheets


Bending Sheets


Doom Bending


Self Tapping Screw


Corner Flash


Redges

Light Blue

Off White

Brick Red

Mist Green

Reliance Green

D-42, Behind Mantri Metallics,5 Star MIDC, Hupari Road, Kagal, Tal. Hatkanangale, Kolhapur - 416236

**Contact - 9922627774**


Industrial Automation
PLC Based Electrical Panels
MCC and Distribution Panles
Industrial Furnace Panels
APFC Panels
Electrical Switchgears
Lighting and Time bell Panels
Shree
|| Sadgurukrupa||
Automation
ISO 9001-2015
Industrial Automation & Electrial panels manufacturing company
Address : G-66, Kagal Five Star MIDC, Kagal, Kolhapur. Mob. 8308949500
Email : suresh.sadgurukrupaautomation@gmail.com


SHREE
SAMARTH KRUPA
E MART
आता कोल्हापूरला जायची गरज नाही
इलेक्ट्रीकल
इलेक्टॉनिक्स्
ॲटोमेशन प्रॉडक्ट
सर्व ई प्रॉडक्टस् आपल्या कागल पंचतारांकित एमआयडीसीत.
Plot No. P4, Makh Association Building, Makh Chowk, Kagal - Hatkanangale MIDC.
8308949500, 9373762980
CONNECT US FOR YOUR
POWERFUL
BUSINESS



FUSION AQUA
FUSION AQUA
MANUFACTURER OF HDPE, PVC & HYDROPHONICS PIPES & FITTINGS
Plot No. A-233, Kagal-Hatakangale Road, Five Star MIDC, Kagal, Kolhapur-416 236.
+91 9960376869, +91 9960399494, +91 9960392424, Off.:+91 9309977494
contact@fusionaqua.in
www.fusionaqua.in
ISO 9001
ISO 9001-2015
Certified Mfg.Company
MJP Approved
IS:4984/3016
ISI
CM/L 7500589947
MORE
STRENTH
HIGHEST
DURABILITY
HDPE PIPES
MDPE PIPES
FITTINGS
HDPE PIPES OF DIAMETER
20MM TO 200MM
MANTRA : 9822518735, 7385304534

**मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ कागल- हातकणंगले (मॅक)**

MAKH

# फाईव्ह स्टार न्यूज

जानेवारी २०२५

## संचालक मंडळ
## सन २०२४-२०२५

| | |
|---|---|
| श्री. मोहन आर्. कुशिरे | अध्यक्ष |
| श्री. विठ्ठल आय्. पाटील | उपाध्यक्ष |
| श्री. सुरेश एम्. क्षीरसागर | मानद सचिव |
| श्री. अमृतराव टी. यादव | मानद खजानिस |
| श्री. अशोक व्ही. दुधाणे | संचालक |
| श्री. संजय आर्. जोशी | संचालक |
| श्री. संजय डी. पेंडसे | संचालक |
| श्री. हरिश्चंद्र एस्. धोत्रे | संचालक |
| श्री. यशवंत व्ही. पाटील | संचालक |
| श्री. भावेश एच्. पटेल | संचालक |
| श्री. अनिल पी. जाधव | संचालक |
| श्री. मुबारक जी. शेख | संचालक |
| श्री. कुमार सी. पाटील | संचालक |
| श्री. शिवाजी के. भोसले | स्वि.संचालक |
| श्री. संगमेश एस्. पाटील | स्वि.संचालक |
| श्री. शंतनू एच्.गायकवाड | सेक्रेटरी |

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| संपादकीय | 3 |
| क्षणचित्रे | 4 |
| नव्या युगातील नवा भारत | 8 |
| इस्रोची नवी भरारी | 11 |
| दिलासादायक वर्तमान | 14 |
| नव्या पानावर लिहू नवे काही... | 17 |
| युद्ध आमचे सुरू.... | 20 |
| अलविदा उस्ताद ! | 23 |

संस्थापक संपादक : **श्री. अशोक दुधाणे**
सहसंपादक : **श्री. संजय पेंडसे**
अध्यक्ष : **श्री. मोहन कुशिरे**
उपाध्यक्ष : **श्री. विठ्ठल पाटील**
सचिव : **श्री. सुरेश क्षीरसागर**
खजानिस : **श्री. अमृतराव यादव**

**फाईव्ह स्टार न्यूज मासिक जाहिरात दरपत्रक**

| जाहिरातीचे प्रकार | मासिक दर | वार्षिक दर | जीएस्टी |
|---|---|---|---|
| पूर्ण पान-रंगीत (कव्हर पेज मागील) | - | २७,५००/- | + १८% |
| पूर्ण पान-रंगीत (आतील पान) | - | २२,०००/- | + १८% |
| अर्धे पान-रंगीत (आतील पान) | - | ११,०००/- | + १८% |
| पूर्ण पान (कृष्णधवल) | ₹ १,६००/- | ₹ १७,६००/- | + १८% |
| अर्धे पान (कृष्णधवल) | ₹ ९००/- | ₹ १०,५००/- | + १८% |

**जाहिरातीसाठी संपर्क : 8530445373, 9561445374**

मुद्रक : मॅक पंचतारांकीत एम्. आय.डी.सी. यांनी 'फाईव्ह स्टार न्यूज' या नावाने 'मंत्र', राजारामपुरी १३ वी गल्ली, कोल्हापूर येथे छापून मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, फाईव्ह स्टार एम्. आय.डी.सी., कागल-हातकणंगले येथून प्रकाशित केले.

# विनम्र आवाहन




## फुल ना फुलाची पाकळी हवी...
## साकारण्या संस्थेची इमारत नवी !

नमस्कार!

उद्योजक मित्र हो, सातत्याने गेली 16 वर्षे आपल्या समोर चाललेला आपल्या असोसिएशनचा प्रवास एका स्वप्नपूर्तीच्या टप्प्यावर येऊन पोहोचला आहे. संस्थेने पसरलेल्या विशाल पंखावर आता फुंकर मारुन जीव ओतायचा आहे. आपल्याला अतिभव्य अशा नूतन इमारतीचा संकल्प करायचा आहे.

सध्याच्या आपल्या कार्यालयाशेजारीच एक भव्यदिव्य वास्तुरेखांकन आम्ही बनवलेले आहे. हे रेखांकन बनवताना भविष्यात लागणाऱ्या उद्योजकांच्या सर्व गरजांचा विचार केलेला आहे. नूतन वास्तूमध्ये उद्योगाच्या सोईसाठी एक भव्य सभागृह, संस्थेसाठी सुसज्ज ऑफीस, ग्रंथालय, उद्योजकांसाठी कॅन्टीन, गेस्ट साठी कॅफेटेरिया, आवश्यक गोष्टींसाठी दुकाने, विविध ऑफिसेस, बँक तसेच सर्व उद्योगातील कुशल कामगारांची गरज लक्षात घेऊन "कौशल्य विकास केंद्र" करण्याचा मानस केला आहे. या केंद्रासाठी लागणाऱ्या मशीन्स व टुलरुमचा देखील विचार केलेला आहे. सदर वास्तुच्या स्वप्नपूर्ततेसाठी आपल्याच लोकांकडून आर्थिक मदत जमा करावयाची आहे. यासाठी आपल्या सारख्या दानशूर व्यक्तिंकडून आम्ही मदतीची अपेक्षा करीत आहोत. आपण दिलेल्या एका दान-पाकळीने या फुलाला आकार येणार आहे. आपण आपल्याच नावाने, अथवा आस्थापनेच्या नावाने किंवा आपल्या प्रियजनांच्या नावाने देणगी देऊ शकता. सदरची देणगी ही इन्कमटॅक्स नियमानुसार 80 G व CSR या दोन्हीसाठी पात्र असून संस्थेला 80 G व CSR ही दोन्ही सर्टिफिकेट नोंदणीकृत मिळालेली आहेत.

आपण एखाद्या भागाचा खर्च देखील उचलू शकता. आपल्या माहिती करिता सदर कामाचे रेखांकन व खर्चाचे अंदाज पत्रक सोबत देत आहोत. आपली ही मदत संस्थेच्या इतिहासात कायमचीच कोरली जाणार आहे व येणाऱ्या नवउद्योजक पिढ्यांना तो एक आदर्श व प्रेरणास्त्रोत असेल.

| श्री. अमृतराव यादव | श्री. सुरेश क्षीरसागर | श्री. संजय जोशी | श्री. विठ्ठल पाटील | श्री. मोहन कुशिरे |
|---|---|---|---|---|
| ऑन. ट्रेझरर | ऑन. सेक्रेटरी | बिल्डींग कमिटी-अध्यक्ष | उपाध्यक्ष | अध्यक्ष |
| 9822303190 | 8308949500 | 9225803098 | 9881204647 | 9604112341 |



संपादकीय

# अर्थक्रांतीचे शिल्पकार

भारतासारख्या विकसनशील देशात आर्थिक उदारीकरण आणतानाच त्यास मानवी चेहरा देणारा नेता म्हणून डॉ. मनमोहन सिंग यांची ओळख सहजासहजी पुसता येणार नाही. डॉ. सिंग यांचे व्यक्तिमत्व इतके सालस, नेमस्त आणि सुसंस्कृत होते की विरोधी पक्षाची लोकंही त्यांच्यावर टीका करण्याचे धाडस सहसा करत नसत आणि टीका केली तरी त्यात कठोरपणा नसे. अर्थतज्ज्ञ असलेले ते देशाचे पहिले पंतप्रधान.फाळणी नंतर त्यांचे कुटुंब भारतात आले आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असताना देखील ते कष्टाने शिकले. केंब्रिज विद्यापीठात अर्थशास्त्र शिकत असताना, अर्थशास्त्रज्ञ जोन रॉबिन्सन आणि निकोलस कॅल्डॉर यांनी त्यांच्यावर संस्कार केले. मानवी जीवनात बदल घडवण्यात राजकारणाची देखील महत्त्वाची भूमिका असते, याचे आकलन केंब्रिजमधील अध्ययनाच्या वेळी डॉक्टर सिंह यांना झाले. मुख्य आर्थिक सल्लागार, अर्थसचिव, नियोजन आयोगाचे सदस्य, रिझर्व बँकेचे गव्हर्नर, पंतप्रधानांचे आर्थिक सल्लागार, विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष अशा वेगवेगळ्या जबाबदारीच्या पदावर त्यांनी ठसा उमटवला. रिझर्व बँकेचे गव्हर्नर असताना रिझर्व बँकेच्या कायद्यात बदल करून नागरी सहकारी बँकांवरील देखरेखीसाठी स्वतंत्र विभागाची स्थापना त्यांनी केली. त्यांच्याच कारकिर्दीत वित्तीय बाजारपेठांचा विस्तार करण्याच्या दृष्टीने पूर्व तयारी करण्यात आली. त्यामुळे या बाजारपेठांचा पुढे जबरदस्त गतीने विस्तार होऊ शकला. त्यांनी केंद्रीय अर्थमंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी व्याजदर ठरवण्याबाबतची बँकावरील नियंत्रणे काढून टाकली. बँकांना आपल्या शाखा काढण्याबाबत स्वातंत्र्य देण्यात आले. चंद्रशेखर हे भारताचे पंतप्रधान असताना देशाची आर्थिक परिस्थिती इतकी नाजूक बनली होती की, सोने गहाण ठेवावे लागले. परंतु डॉक्टर सिंग यांनी अर्थमंत्री म्हणून पोथीनिष्ठ पंडितांच्या विरोधाची तमा न बाळगता आर्थिक सुधारणा धाडसाने राबवल्या. त्यांच्या अर्थमंत्री पदाच्या काळात जीडीपी प्रथमच 7 टक्क्यांवर गेला. मात्र, अर्थमंत्री व पंतप्रधान झाल्यावरही नफ्यातील नव्हे, तर आजारी सार्वजनिक उद्योगांच्याच विक्रीला त्यांनी प्राधान्य दिले. सार्वजनिक उपक्रमांच्या खाजगीकरणावर भर न देता सरकारी मक्तेदारी संपुष्टात आणणे, हे त्यांचे धोरण होते. बँकिंग आणि विमा क्षेत्रात त्यांनी सार्वजनिक मालकीच्या अर्थसंस्था मजबूत ठेवल्या. त्यामुळे 2008 मधील जागतिक संकटावर मात करणे भारताला शक्य झाले. सत्तेबाहेर गेल्यानंतरही अर्थव्यवस्था सुधारण्या संबंधिच्या विधायक सूचना ते करत. पंतप्रधान वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, सुषमा स्वराज, प्रभृतींशी त्यांचे उत्तम संबंध होते. राजकारणात कोणीही शत्रू नाही, असे मानणारा हा अजात शत्रू नेता होता.

-अशोक दुधाणे

MAKH

# 26 जानेवारी 2025
## प्रजासत्ताक दिन मॅकच्या प्रांगणात संपन्न




७५ वा भारतीय प्रजासत्ताक दिन सुवर्णा अलॉयज प्रा. लि. च्या संचालिका रेश्मा सुवर्णा यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करून संपन्न झाला. या प्रसंगी मॅकचे अध्यक्ष मोहन कुशिरे, उपाध्यक्ष विठ्ठल पाटील, ऑन. सेक्रेटरी- सुरेश क्षीरसागर, ऑन. ट्रेझरर अमृतराव यादव, श्रीमती उमा शर्मा, सोबत मॅकचे इतर पदाधिकारी व अग्निशमन अधिकारी व मान्यवर उद्योजक.

# के. के. सुवर्णा कॅन्टीनचे मॅक येथे उद्घाटन



मॅकच्या नूतन इमारती मधील के. के. सुवर्णा कॅन्टीनचे उद्घाटन करताना रेशमा सुवर्णा, मॅकचे अध्यक्ष मोहन कुशिरे आदी

भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन मॅकच्या नूतन इमारतीमधील के. के. सुवर्णा कॅन्टीनचे उद्घाटन रेशमा सुवर्णा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मोहन कुशिरे म्हणाले, उद्योजकांच्या असणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी आम्ही नक्कीच संस्थेच्या माध्यमातून प्रयत्न करीत राहू अशी ग्वाही दिली. यावेळी रेशमा सुवर्णा म्हणाल्या, उद्योगाशी निगडीत असणाऱ्या दैनंदिन घडामोडीची माहिती त्वरित उद्योजकांना मिळावी या दृष्टिकोनातून संस्थेची वाटचाल सुरू आहे. उद्योजकांच्या, कामगारांच्या व पर्यटकांच्या सोई करिता आज आपण उत्कृष्ट पद्धतीचा आहार उपलब्ध व्हावा या हेतूने श्री. के. के. सुवर्णा कॅन्टीनची उभारणी केली आहे. बिल्डींग कमिटी अध्यक्ष-मॅक संजय जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून आदित्य शहा यांनी संस्थेच्या नूतन वास्तू उभारणी करिता ५ लाख रुपये देणगी दिल्याबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. राजरत्न सुवर्णा व रेशमा सुवर्णा यांनी संस्थेच्या नूतन इमारती मधील कॅन्टीन उभारणी करिता मोलाचे सहकार्य केल्याबद्दल त्यांचे मॅक च्या वतीने आभार व्यक्त केले. कार्यक्रमास मार्व्हलस ग्रुप चे चेअरमन संग्राम पाटील, सुवर्णा अलॉयज चे एच. आर. अभिजीत पाटील, अग्निशमन विभागाचे अधिकारी व सहकारी, अशोक माळी, सेवा दवाखाना स्टाफ, मॅकचे उपाध्यक्ष विठ्ठल पाटील, ऑन सेक्रेटरी सुरेश क्षीरसागर, संजय जोशी, अशोक दुधाणे, संजय पेंडसे, यशवंत पाटील, अनिल जाधव, भावेश पटेल, कुमार पाटील, संगमेश पाटील, अभिजीत पाटील, उमा शर्मा, सत्यन शर्मा, आदित्य शहा, अशोक चौगुले, लता जैन, दिनेश जैन, अवधूत नाईक, विजय माळी, वैभव हांजे, उद्योजक उपस्थित होते. ऑन सेक्रेटरी सुरेश क्षीरसागर यांनी आभार मानले.

# मॅकच्या नूतन इमारतीत के. के. सुवर्णा यांच्या स्मरणार्थ कॅन्टीनचा शुभारंभ
















# आरोग्य विषयक मार्गदर्शन व माहिती बाबत मॅक मध्ये सेमिनार संपन्न

मॅन्युफॅक्चरर्स असो. ऑफ कागल - हातकणंगले (मॅक) मार्फत दिनांक ०४/०१/२०२५ रोजी मा. सुनिल कुलकर्णी यांचा 'आरोग्यम धनसंपदा' या अंतर्गत दैनंदिन जीवनावर परिणाम करू शकणाऱ्या 'आरोग्य विषयक जागरूकता व योग' या विषयावर सेमिनार संपन्न झाला. मॅक च्या वतीने मॅक चे अध्यक्ष मोहन कुशिरे यांच्या हस्ते सुनिल कुलकर्णी यांचा बुके देवून स्वागतपर सत्कार करण्यात आला. सुनिल कुलकर्णी यांनी दैनंदिन जीवनामध्ये आहार विहार बदलला आहे व त्यामुळे आरोग्यावरील परिणाम तसेच काम करत असताना मानसिक ताण तनाव वाढणे अशा वेळी कामावर आहे त्या ठिकाणी काही सोप्या पद्धतीने शारीरिक ताण कमी करण्याचे उपाय सांगितले व तसे प्रात्यक्षिक घेण्यात आले तसेच सकाळी उठल्यानंतर योग करण्याने होणारे फायदे व त्याबाबतचे मार्गदर्शन त्यांनी केले. मा. सुनिल कुलकर्णी यांनी सेमिनारसाठी आमंत्रित केल्याबद्दल मॅकचे आभार व्यक्त करून असाच ऋणानुबंध ठेवावा अशा भावना व्यक्त केल्या. सदर सेमिनारसाठी मॅक चे अध्यक्ष मोहन कुशिरे, उपाध्यक्ष, विठ्ठल पाटील, ऑन. ट्रेझरर, अमृतराव यादव, मॅकचे संचालक हरिश्चंद्र धोत्रे, कुमार पाटील तसेच विविध कंपनीतील प्रतिनिधी व इतर मान्यवर उद्योजक सभासद बंधू भगिनी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आभार मॅक चे संचालक हरिश्चंद्र धोत्रे यांनी मानले.









कव्हर स्टोरी

# नव्या युगातील नवा भारत

बाबा कल्याणी
अध्यक्ष,
भारत फोर्ज लिमिटेड

***मजबूत लोकशाहीसाठी प्रदीर्घ काळापासून ओळखला जाणारा भारत आता जागतिक आर्थिक आणि उत्पादन शक्तीकेंद्र म्हणून उदयास येत आहे. आज आपण 'विकसित भारत २०४७' चे उद्दिष्ट ठेवून मार्गक्रमण करत आहोत. भारताला विकसित राष्ट्रात बदलण्याची ही योजना आहे. पुढील २५ वर्षांमध्ये, भारताचे सकल राष्ट्रीय उत्पन्न ४ ट्रिलियन डॉलरवरून ३० ट्रिलियन डॉलरपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. या प्रवासात देशातील तरुणांना येत्या काही वर्षांत अनेक संधी वाट्याला येतील. परंतु, आपल्याला केवळ 'जगाची फॅक्टरी' बनणे परवडणारे नाही; आपण एक 'इनोव्हेशन ड्रिव्हन इकॉनॉमी' म्हणून उदयास येणे आवश्यक आहे. नव्या युगातील नव्या भारताच्या प्रगतीसाठी समर्पित भावाने योगदान देणे हे आपले कर्तव्य आहे.***

---

नवीन वर्षात पदार्पण करताना एक अभिमानी भारतीय म्हणून,आपल्या देशाच्या विकासात योगदान देणे आणि भारताला जागतिक नेता म्हणून स्थापित करण्यामध्ये समर्पित भावाने योगदान देणे हे आपले कर्तव्य आहे. आज एक देश म्हणून भारत जागतिक स्तरावर ज्या प्रकारची सकारात्मक छाप पाडत आहे, तसा मी यापूर्वी कधीही अनुभवला नव्हता. आर्थिक वाढ, आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरी आणि परराष्ट्र संबंध, व्यवसायाच्या संधी, विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोपक्रम, आरोग्यसेवा आणि अगदी चित्रपट, खेळ आणि संस्कृती अशा जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात एक देश म्हणून भारत आज आघाडीवर आहे आणि एक प्रमुख शक्ती म्हणून उदयास आला आहे. आज आपण 'विकसित भारत २०४७' चे उद्दिष्ट ठेवून मार्गक्रमण करत आहोत. भारताला

विकसित राष्ट्रात बदलण्याची ही योजना आहे. पुढील २५ वर्षांमध्ये, भारताचे सकल राष्ट्रीय उत्पन्न ४ ट्रिलियन डॉलरवरून ३० ट्रिलियन डॉलरपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. या प्रवासात देशातील तरुणांना येत्या काही वर्षांत अनेक संधी वाट्याला येतील. परंतु, आपल्याला केवळ 'जगाची फॅक्टरी' बनणे परवडणारे नाही; आपण एक 'इनोव्हेशन ड्रिव्हन इकॉनॉमी' म्हणून उदयास येणे आवश्यक आहे. जगभरात सर्वोत्कृष्ट दर्जाची उत्पादने आणि सोल्युशन्स देणारी आणि निर्यात करणारी अर्थव्यवस्था बनण्याची क्षमता भारतात निश्चितपणाने आहे.

हे शतक भारताचे आहे. जीडीपीमध्ये झालेली वाढ टिकवून ठेवण्यासाठी नवोपक्रमाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ही वाढ कायम ठेवण्यासाठी, आपण तंत्रज्ञानात नवनवीन संशोधन केले पाहिजे. इतरांच्या तंत्रज्ञानावर आपण अवलंबून राहू शकत नाही; आपल्याला स्वदेशी तंत्रज्ञानाचा विकास करणे आवश्यक आहे. संरक्षण क्षेत्रात आम्ही हे करत आहोत. स्वदेशी तोफखाना तंत्रज्ञान तयार करत आहोत.

सध्या भारताच्या अर्थव्यवस्थेत उत्पादन क्षेत्राचे योगदान अंदाजे ६०० अब्ज आहे, जे देशाच्या जीडीपीच्या सुमारे १५ टक्के आहे. योग्य रणनीतींसह, येत्या काही वर्षांत उत्पादनक्षेत्रात लक्षणीय वाढ होऊ शकते. येत्या २५ वर्षात भारतीय अर्थव्यवस्था २५ ट्रिलियन ते ३५ ट्रिलियन डॉलर्सच्या दरम्यान असेल तेव्हा त्यामध्ये उत्पादन क्षेत्राचे योगदान २० ते २५ टक्के सहज असेल, असा आमचा विशास आहे. आज जागतिक भूराजकीय संकटे असूनही उत्पादनक्षेत्राची वाढ होत आहे, हे लक्षात घ्यायला हवे. आगामी काळात सेवा आणि वित्तीय क्षेत्राच्या वाढीबरोबर भारताच्या अर्थव्यवस्थेचा विस्तार होत असताना येणाऱ्या काळात रोजगार निर्मितीसाठी उत्पादन केंद्रस्थानी असेल.

देश दीर्घकाळापासून नावीन्यपूर्णतेसाठी आयातीवर अवलंबून राहिला. तथापि, जागतिक पुरवठा साखळी बदलत असताना, भारताकडे अत्यावश्यक तंत्रज्ञान आणि उत्पादने मिळविण्यासाठी कमी स्त्रोत शिल्लक राहिल्याने ही निर्भरता अधिकाधिक समस्याप्रधान होऊ शकते. त्यामुळे भारताने इनोव्हेशन, संशोधन आणि विकास यावर प्रचंड भर देण्याची गरज आहे. येत्या २५ वर्षांत भारताच्या आर्थिक वाटचालीला आकार देण्यासाठी देशातील तरुण प्रतिभा परिवर्तनाची भूमिका बजावू शकेल. भारतातील तरुणांध्ये असलेल्या प्रतिभेबाबत मी आश्वस्त आहे. आज स्टार्टअपच्या जगात खूप काही घडताना दिसत आहे. आमच्यासारखे लोक आता प्राचीन वस्तू बनले असून तरुणाई अकल्पित आणि आश्चर्यकारक गोष्टी करत आहे.

मजबूत लोकशाहीसाठी प्रदीर्घ काळापासून ओळखला जाणारा भारत आता जागतिक आर्थिक आणि उत्पादन शक्तीकेंद्र म्हणून उदयास येत आहे. जागतिक व्यापाराचा प्रमुख चालक बनण्याच्या उंबरठ्यावर उभा आहे. २०२३ ते २०३३ दरम्यान भारत जागतिक आर्थिक विकासात २० टक्के योगदान देऊ शकतो. पंतप्रधान मोदींच्या आत्मनिर्भर भारतच्या आवाहनाने प्रेरित होऊन, आम्ही नाविन्यपूर्ण अर्थव्यवस्था बनण्याचा निर्धार केला आहे. सेमीकंडक्टर, अक्षय ऊर्जा आणि लहान मॉड्यूलरमधील गुंतवणूक या क्षेत्रात भारत वेगाने पुढे जात आहे. भारतीय कंपन्या २०३० पर्यंत २० दशलक्ष रोबोट्सची निर्मिती करणार आहेत. आर्टिफिशिल इंटेलिजन्सच्या क्षेत्राचे नेतृत्व उद्याच्या भविष्यात भारत करेल. जागतिक आव्हानांना भारत हे उत्तर आहे.

संरक्षण क्षेत्रातील वाढती निर्यात बदलत्या भारताची साक्ष देणारी आहे. नरेंद्र मोदी सरकारचे पहिले संरक्षण खरेदी धोरण २०१६ मध्ये जाहीर करण्यात आले होते. तोपर्यंत, खाजगी क्षेत्राला संरक्षण उत्पादनात अत्यंत मर्यादित भूमिका बजावण्याची परवानगी होती. यानंतर भारतीय संरक्षण उद्योगात गेल्या सात-आठ वर्षांत जे काही घडले ते इतर कोणत्याही मंत्रालयासाठी केस स्टडी आहे. या काळात खाजगी आणि सार्वजनिक अशा दोन्ही प्रकारच्या उद्योगांची संपूर्ण परिसंस्था तयार करण्यात आपण सक्षम झालो आहोत. अजून बराच पल्ला गाठायचा असला तरी आपण नक्कीच नेत्रदीपक प्रगती केली आहे. भारताच्या संरक्षण निर्यातीने २०२४ या आर्थिक वर्षामध्ये उच्चांक गाठला असून या निर्यातीमध्ये ६० टक्के वाटा हा खासगी क्षेत्राचा आहे, हे लक्षात घ्यायला हवे. आमच्या संरक्षण व्यवसायात निर्यातीचा वाटा ८० टक्के आहे.

आर्टिलरी गन बनवण्याची सर्वात मोठी क्षमता आमच्याकडे आहे. आम्ही महिन्याला १२ तोफा बनवू शकतो, तर मोठे युरोपियन उत्पादक केवळ चार तोफा बनवू शकतात. आर्टिलरी तोफा खरेदी करणाऱ्याला पुढील २५-३० वर्षांसाठी स्पेअर पार्ट्सची आवश्यकता असेल आणि ते जगभरात पुरवठा करण्याची आमच्याकडे क्षमता आहे. रशिया-युक्रेन युद्धानंतर युरोपातील लहान- मोठ्या प्रत्येक देशाने पुन्हा दारूगोळा साठवायला सुरुवात केली आहे. युक्रेनयुद्धानंतर सात किंवा १५ दिवसांच्या युद्धाच्या पूर्वीच्या संकल्पनांचे पुनर्मूल्यांकन केले जात असल्याने सर्वच देश त्यांच्या युद्धसामग्री साठ्यात वाढ करत आहेत. ही भारतासाठी मोठी संधी आहे.

आज सबंध जगभरात एआयची चर्चा मोठ्या प्रमाणावर होत आहे. एलोन मस्क जगातील प्रत्येक राजकीय नेत्याशी बोलत आहेत आणि त्यांना सांगत आहेत की येणाऱ्या काही वर्षांत एआयमुळे कारखान्यांना कामगारांची गरज भासणार नाही. ही बाब चिंताजनक असली तरी भारताला या तंत्रज्ञानाचा एक भाग असणे आवश्यक आहे. एआय आणि मशीन लर्निंग हे तंत्रज्ञानातील नवीन दिशा दर्शवतानाच भविष्यासाठीचा मार्ग प्रशस्त करताहेत. येणाऱ्या काळात आपल्या उत्पादन प्रक्रियेध्ये आयओटी (इंटरनेट ऑफ थिंग्ज) आणि इंडस्ट्री ४.० समाविष्ट करणे आवश्यक आहे. भारत फोर्जध्ये, आम्ही पाच वर्षांपूर्वी इंडस्ट्री ४.० लागू केला होता आणि आमचा संपूर्ण प्लांट आता या प्रगत तंत्रज्ञानाने चालतो. एआयमधील सर्वात लक्षणीय प्रगती म्हणजे लार्ज लँग्वेज मॉडेल तंत्रज्ञानाचा विकास. भारत फोर्ज उत्पादन प्रक्रियेसाठी या तंत्रज्ञानाचा वापर करत आहे आणि आमच्या ग्राहकांना नवनवीन उपाय देत, वेगळ्या व्यवसायात रूपांतरित करण्याच्या शक्यतांचा अंदाज घेत आहे. एआयच्या जगात आवश्यक ज्ञान आणि कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे जेणेकरुन या तंत्रज्ञानाचे फायदे पूर्णपणे लक्षात येतील.

पहिली औद्योगिक क्रांती ब्रिटनमध्ये वाफेच्या इंजिनद्वारे चालविली गेली. दुसरी क्रांती म्हणजे फोर्डने १९०० च्या दशकाच्या सुरुवातीस आपली पहिली मोठ्या प्रमाणात उत्पादित कार बनवली आणि तिसरी क्रांती इलेक्ट्रॉनिक्सच्या उदयामुळे झाली जिने सर्व उद्योगांची गतिशीलता बदलली. आज, तांत्रिक प्रगती अभूतपूर्व वेगाने होत आहे. या परिस्थितीत नवीन औद्योगिक क्रांती अंदाजे दर पाच वर्षांनी होत आहेत. या जलद बदलांशी जुळवून घेण्यासाठी आपल्याला तयार राहावे लागेल. अत्याधुनिक युगामध्ये सतत शिकण्याची आणि गुंतवणूक करण्याची संस्कृती आत्मसात केल्याने टेक्नॉलॉजिकल इनोव्हेशन, ड्रायव्हिंग ॲडव्हान्समेंट्स एआय, रोबोटिक्स आणि प्रगत सामग्रीमध्ये आघाडीवर राहणे शक्य होईल. यादृष्टीने उद्योगजगताचा पुढाकार आवश्यक आहे. उद्योगधंदे वाढले आणि अर्थव्यवस्था वाढली, तर उपेक्षित समाजासह समाजातील प्रत्येकाला त्याचा फायदा होईल. मी तुम्हाला आमच्या सीएसआर कार्याचे एक साधे उदाहरण देईन. नगर जिल्ह्यातील दुर्ग भागात एक आदिवासीबहुल गाव आहे. ते डोंगराळ भागात आहे. या भागात क्वचितच कोणी जात असेल. आम्ही तिथे काही तरी करावे हे ठरवले तेव्हा सर्वांत आधी हे लोक काय करतात याचा अभ्यास केला. तेव्हा लक्षात आले की, तेथे दररोज सकाळी दोन-तीन ट्रक यायचे, शे-दोनशे लोक त्या ट्रकमध्ये बसायचे आणि ते विविध ठिकाणी मजूर म्हणून काम करून परत यायचे. ही त्यांची जीवनशैली होती. आम्ही या सर्व परिस्थितीचे विश्लेषण केले. त्या डोंगराळ भागात बरीच जमीन होती. बुलडोजरने आम्ही त्यापैकी २०-३० एकर जमीनीचे सपाटीकरण केले. मग नांगरणी करुनया भागातील लोकांना बटाट्याच्या लागवडीची माहिती दिली. ती फक्त सुरुवात होती. प्रत्यक्षात जेव्हा पहिले पीक उगवले तेव्हा लोकांच्या डोळ्यांत अश्रू दाटून आले. मजुरीसोडून आपण काही तरी करू शकतो, असे त्यांना कधी वाटले नव्हते. आज तेथे नियमितपणाने शेती केली जात आहे आणि त्यातून त्यांची संपूर्ण जीवनशैली बदलली आहे. पर्यावरणाची हानी न करता, निसर्गाची हानी न करता, शोशत पद्धतीने विकासाची प्रक्रिया पुढे नेली तर ती सर्वांसाठी फायदेशीर ठरेल आणि सर्वंकष विकासाचे उद्दिष्ट साधले जाईल.

(शब्दांकन : हेमचंद्र फडके)



गौरव

# इस्रोची नवी भरारी

श्रीनिवास औंधकर
खगोलशास्त्र अभ्यासक

***इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशनचे नवीन स्पेडेक्स मिशन ही केवळ एक तांत्रिक उपलब्धी नाही तर ते अंतराळातील भारताचे योगदान देखील दर्शवते. या मिशनचे मुख्य कार्य दोन अंतराळ यानांना डॉक करणे (जोडणे) हे आहे. अंतराळ तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताचे कौशल्य वाढवण्यासाठी ते उपयुक्त ठरेल. डॉकिंग तंत्रज्ञान ऊर्जा पर्यायांवर तसेच उच्च तंत्रज्ञान मार्गदर्शन प्रणालींवर आधारित आहे. केवळ सध्याच्या मोहिमांसाठीच महत्त्वाचे नाही, तर चंद्रावरून मातीचे नमुने परत आणण्याचे उद्दिष्ट असलेल्या चांद्रयान-४ सारख्या आगामी मोहिमांचा पायाही या मिशनच्या यशाने घातला जाईल.***

---

इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन अर्थात इस्रोने नुकतेच श्रीहरिकोटा येथून पीएसएलव्ही रॉकेटद्वारे आपली अत्यंत महत्त्वाकांक्षी स्पाडेक्स मिशन (स्पेस डॉकिंग एक्सपेरिमेंट ) लाँच केले आणि अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रातील एका नव्या अध्यायाची सुरवात झाली. इस्रोने आपल्या अंतराळ कार्यक्रमातील 'माईलस्टोन' असे म्हटले आहे. भारतीय अंतराळ स्थानकाच्या उभारणीवर आणि चंद्रावर जाणे, तेथे उतरणे, परत पृथ्वीवर पोहोचणे यांसह संपूर्ण चांद्रयान-४ मोहिमेचे यश यावर इस्रोच्या स्पॅडेक्स मिशनच्या यशावर अवलंबून असेल, असे मानले जाते. याचे कारण चांद्रयान-४ मध्ये प्रत्यक्षात अनेक मॉड्यूल्स आहेत. ते दोन वेगवेगळ्या मॉड्यूल्समध्ये एकत्रित केले जातील आणि वेगवेगळ्या वेळी लॉन्च केले जातील. यामध्ये पृथ्वीच्या कक्षेबरोबरच चंद्राच्या कक्षेतही डॉकिंग केले जाणार आहे. पीएसएलव्ही रॉकेटच्या साहाय्याने अंतराळात दोन

छोट्या यानांचे डॉकिंग करणे म्हणजेच जोडणे आणि अनडॉक करणे (वेगळे करणे) ही प्रक्रिया पूर्ण करणे हा इस्रोच्या या मोहिमेचा उद्देश आहे.

वास्तविक, या मोहिमेत एकाच रॉकेटमध्ये उपग्रहाचे दोन भाग सोडण्यात आले आहेत. पण अवकाशात ते वेगवेगळ्या ठिकाणी स्थापित करण्यात येणार आहेत. त्यानंतर त्यांना एकमेकांच्या जवळ आणून जोडले जाणार आहे. चेसर आणि टार्गेट अशी या दोन उपग्रहांची नावे आहेत. या मिशनमध्ये, चेसर लक्ष्याचा पाठलाग करेल आणि त्याच्याशी डॉक करेल. टार्गेट आणि चेजरचा वेग ताशी २८ हजार ८०० किलोमीटरपर्यंत जाणार आहे. सुमारे २० किलोमीटरपर्यंतच्या अंतरावरून चेजर



स्पेसक्राफ्ट टार्गेट स्पेसक्राप्टच्या दिशेने जाईल. त्यानंतर हे अंतर कमी होऊन ५ किलोमीटर अंतरापर्यंत पोहोचणार आहे. त्यानंतर दीड किलोमीटर आणि पुढे जाऊन ५०० मीटर होईल. जेव्हा चेजर आणि टार्गेटच्या दरम्यानचे अंतर तीन मीटरवर येईल तेव्हा डॉकिंग म्हणजे दोन्ही स्पेसक्राफ्टच्या जोडण्याची प्रक्रिया सुरू होईल. चेजर आणि टार्गेट जोडल्या गेल्यानंतर इलेक्ट्रिकल पॉवर ट्रान्सफर केले जाईल. ही सर्व प्रक्रिया पृथ्वीवरून नियंत्रित केली जाणार आहे. अंतराळातील दोन वेगवेगळ्या गोष्टींना जोडण्याचे हे तंत्रज्ञान आगामी काळात भारताला स्वतःचे अंतराळ स्थानक तयार करण्यास साहाय्यभूत ठरणारे आहे. अशा प्रकारच्या स्वदेशी डॉकिंग प्रणालीद्वारे स्पेस डॉकिंग करणाऱ्या देशांच्या निवडक गटामध्ये सामील होणारा भारत हा चौथा देश बनला आहे. सध्या या गटात अमेरिका, चीन आणि रशिया यांचा समावेश आहे. १६ मार्च १९६६ रोजी अमेरिकेने प्रथम अंतराळात डॉकिंग केले होते. सोव्हिएत युनियनने ३० ऑक्टोबर १९६७ रोजी पहिल्यांदा दोन स्पेसक्राफ्ट डॉकिंग केले होते.स्पेडेक्स मिशनसाठी प्रथमच वापरण्यात आलेल्या दोन्ही उपग्रहांची निर्मिती आणि एकत्रीकरण हे 'एटीएल' या खासगी उद्योगाकडून करण्यात आले आहे. बंगळूरमधील 'एटीएल'च्या एअरोस्पेस पार्कमध्ये या उपग्रहांची निर्मिती आणि जुळवणी करण्यात आली आहे.

इस्रोचे प्रमुख एस सोनाथ यांच्या म्हणण्यानुसार, उपग्रहांच्या डॉकिंगला सुरुवात झाली असून ही प्रक्रिया ७ जानेवारीपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. या प्रयोगामुळे कक्षेतून बाहेर पडलेला आणि वेगळ्या दिशेने जाणारा उपग्रह पुन्हा कक्षेत आणण्याचे तंत्रज्ञानही इस्रोला मिळणार आहे. त्याचबरोबर निर्धारीत कक्षेतच या उपग्रहांचे सर्व्हिसिंग आणि रिफ्युलिंग करण्याचा पर्यायही उपलब्ध होणार आहे. भविष्यात उपग्रहांची दुरुस्ती, इंधन भरणे आणि अंतराळातील कचरा हटवण्यासाठीही ही

मोहीम उपयुक्त ठरणार आहे.

थोडक्यात, स्पॅडेक्स मिशन हे केवळ तांत्रिक दृष्ट्या मिळालेले यश नसून ते अंतराळ संशोधनातील भारताच्या वाढत्या प्रभावाची साक्ष देणारे आणि भविष्यातील नवी कवाडे उघडणारे आहे. दोन अंतराळ यानांना डॉक करण्याची किमया अंतराळ तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताचे कौशल्य वाढवण्यासाठी उपयुक्त ठरेल.

डॉकिंग तंत्रज्ञान ऊर्जा पर्यायांवर तसेच उच्च-तंत्रज्ञान मार्गदर्शन प्रणालींवर आधारित आहे. ते अंतराळात संवादाशिवाय कार्य करेल. हे केवळ सध्याच्या मोहिमांसाठीच महत्त्वाचे नाही, तर चंद्रावरून मातीचे नमुने परत आणण्याचे उद्दिष्ट असलेल्या चांद्रयान-४ सारख्या आगामी मोहिमांचा पायाही यामुळे घातला जाणार आहे. इस्रोने या डॉकिंग तंत्रज्ञानाला'इंडियन डॉकिंग सिस्टीम' असे नाव दिले असून त्याचे पेटंटही घेतले आहे. ही मोहीम भारताच्या विज्ञान आणि नवकल्पनातील वाढत्या क्षमतेचे द्योतक असून ती भविष्यातील उपग्रह सेवा आणि आंतरग्रहीय मोहिमांसाठी महत्त्वाची ठरणारी आहे. भारतीय विज्ञान समुदायासाठी ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. जागतिक स्तरावर भारतीय शास्त्रज्ञांची तांत्रिक आणि वैज्ञानिक क्षमता सिद्ध करण्यास या मोहिमेने बळकटी मिळणार आहे. स्पेडेक्स मिशन हा भारताच्या अंतराळ धोरणातील एका नवीन अध्यायाचा ओनामा आहे. तो युवकांना खगोलशास्त्राकडे, अवकाश संशोधनाकडे आकर्षित करण्यास आणि नवीन वैज्ञानिक मानसिकतेला प्रोत्साहन देणारा आहे. सुप्रसिद्ध अंतराळवीरांना सुनीता विल्यम्स यांनी ज्याप्रमाणे स्पेस क्रू लाइनरने पृथ्वीवरून निघून स्पेस स्टेशनमध्ये प्रवेश केला. त्याचप्रमाणे भारताला शिल्ड युनिट बनवायचे असून त्यासाठी डॉकिंगची गरज आहे.

चांद्रयान ३ मोहीम यशस्वी झाल्यानंतर संपूर्ण जगाने इस्रोच्या शास्त्रज्ञांची मुक्त कंठाने प्रशंसा केली होती. आता स्पाडेक्स मिशनमुळे अंतराळ संशोधकांनी नवी भरारी घेतली आहे. उपग्रह सेवा, अंतराळ स्थानक ऑपरेशन्स आणि आंतरग्रहीय शोध या क्षमता भविष्यातील मोहिमांसाठी महत्त्वपूर्ण आहेत. अंतराळ संशोधनाच्या विकासाचे अर्थकारणही यानिमित्ताने समजून घ्यायला हवे. २०२३ मध्ये ८.४ अब्ज मूल्य असलेली अंतराळ अर्थव्यवस्था २०३३ पर्यंत ४४ अब्जापर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. या क्षेत्रातील गुंतवणूक १००० कोटी रुपयांवर पोहोचली असून भारत जागतिक स्तरावर आघाडीवर आहे.

भारताचे अंतराळ क्षेत्र परकीय चलन कमावणारे महत्त्वपूर्ण क्षेत्र म्हणून उदयास आले आहे. परदेशी उपग्रह प्रक्षेपित करून कमावलेल्या २२ कोटी युरोंपैकी १८.७ कोटी युरो म्हणजेचह्नएकूण ८५ टक्के हे गेल्या आठ वर्षांत कमावले आहेत. आजघडीला इस्रोच्या सेवांचा लाभ घेणाऱ्या देशांध्ये अमेरिका, फ्रान्स, जपान यांसारख्या प्रगत देशांसह अनेक विकसनशील देश समाविष्ट आहेत.

येणाऱ्या काळात इस्रो अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात यशाची नवनवीन शिखरे गाठण्याची जोरदार तयारी करत आहे. फेब्रुवारी २०२५ मध्ये व्योमित्रा ही महिला रोबोट अवकाशात प्रस्थान करणार आहे. ती गगनयान मोहिमेसाठी अंतराळवीरांसारखी कार्ये हाती घेईल. पुढील वर्षी म्हणजे २०२६ मध्ये गगनयान मिशनचे पहिले क्रू अंतराळात झेप घेतली. इस्रोच्या अंदाजानुसार २०३५ मध्ये भारताचे स्वतःचे अंतराळ स्थानक प्रत्यक्षात आलेले असेल. भारतीय स्वातंत्र्याला १०० वर्षे पूर्ण होतील तेव्हा२०४७ मध्ये भारताचा पहिला अंतराळवीर चंद्रावर उतरवण्याची महायोजनाही इस्रोच्या अजेंड्यावर आहे. कृषी, संरक्षण, जलसंपत्ती व्यवस्थापन, स्मार्ट शहरे आणि पायाभूत सुविधांच्या विकासामध्ये अंतराळ तंत्रज्ञानाचा खूप मोठा फायदा होत असल्याचे आपण आज पहात आहोत. हवामान अंदाजासाठी मिशन मौसम सारखे उपक्रम भारताच्या वाढत्या अंतराळ क्षमतांचा प्रभाव दाखवणारे आहेत. आता येणाऱ्या भविष्यात अंतराळ संशोधनाच्या कक्षा जसजशा रुंदावत जातील तसतसे लोकजीवन सुखकर करण्यासाठी नवनव्या संकल्पना राबवल्या जातील. त्याचबरोबर विश्वाच्या अफाट पसाऱ्यातील अनेक रहस्यांची उकलही होताना दिसेल. तूर्त या महामोहिमेबाबत इस्रोच्या संशोधकांचे मनःपूर्वक अभिनंदन.



अर्थकारण

# दिलासादायक वर्तमान

अभिजित कुलकर्णी
आर्थिक घडामोडींचे अभ्यासक

***भारतीयांच्या बचतीबाबत अलीकडील काळात चिंता व्यक्त होऊ लागली होती. याचे कारण वाढलेली महागाई, बेरोजगारी यांसह आदी कारणांळे भारतीयांच्या बचतीचा आलेख घसरत असल्याचे काही पाहण्यांधून दिसून आले होते. परंतु मावळत्या वर्षाच्या अखेरीस प्रसिद्ध झालेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या सविस्तर अहवालाने यावर नवा प्रकाश टाकला असून तो दिलासादायक आहे. या अहवालात देशवासीयांच्या बचतीत झालेली वाढ आणि त्यांच्या बचतीच्या पद्धतींमध्ये होणारे बदल यांचे सखोल विश्लेषण मांडण्यात आले आहे. बचतीतील वाढ ही अर्थव्यवस्था मजबूत होत असल्याचे निदर्शक मानावे लागेल.***

'थेंबे थेंबे तळे साचे' ही उक्ती अर्थव्यवहारात आचरणात आणून आपल्याला मिळणाऱ्या उत्पन्नातून जमेल तेवढी रक्कम बाजूला काढून साठवत राहणे ही भारतीयांची परंपरा राहिली आहे. पूर्वीच्या काळापासून हा पैसा कधी पोस्टामध्ये, सोन्यामध्ये, बचत खात्यांमध्ये, मुदत ठेवींमध्ये गुंतवला जातो. शे-पाचशे करत करत त्यातून मोठी रक्कम उभी राहिल्यानंतर त्यातून संसारासाठी एखादी वस्तू घेणे, जमीन घेणे, सोने घेणे, घर घेणे यांसारखी उद्दिष्टे साध्य केली जातात. अगदी गावाखेड्यांमधील निम्न मध्यमवर्गीय कुटुंबांपासून ते श्रीमंत शहरी कुटुंबांपर्यंत सर्वदूर ही आर्थिक सवय शिस्तीसारखी पाळली जाते. त्यामुळेच भारत हा बचतकर्त्यांचा देश म्हणून ओळखला जात असे. २००८ मध्ये अमेरिकेतील लेहमन ब्रदर्स कोसळल्यानंतर जागतिक आर्थिक मंदीचा जो घंटानाद झाला त्याचे प्रतिध्वनी भारतापर्यंत आले; पण या मंदीची फारशी झळ भारताला बसली नाही. यामध्ये तत्कालीन राज्यकर्त्यांच्या धोरणांचा जसा मोलाचा वाटा होता तसाच भारतीयांच्या बचतीचाही हिस्सा मोठा राहिला.

नव्वदीच्या दशकामध्ये आलेल्या जागतिकीकरणाच्या लाटेनंतर 'यूज अँड थ्रो' संस्कृती बोकाळत गेली आणि अंथरूण पाहून पाय पसरा ही शिकवणूक मागे पडून चैनीचे युग आले. त्यामध्ये क्रेडिट कार्डसारखे 'आज खर्च करा, उद्या पैसे द्या' असे आमिष दाखवून भरमसाठ व्याज आकारणीद्वारे लोकांच्या खिशाला कात्री लावणारे पर्याय उपलब्ध झाले आणि अनेक भारतीयांची परंपरागत चालत आलेली आर्थिक शिस्त बिघडत गेली. दुसरीकडे वाढलेली महागाई, बेरोजगारी यांसह आदी कारणांमुळे भारतीयांच्या बचतीचा आलेख घसरु लागला. विशेषतः अलीकडील काळातील काही पाहण्यांधून भारतातील बचतीचे प्रमाण कमालीचे घटल्याचे दिसून आले होते. परंतु मावळत्या वर्षाच्या अखेरीस प्रसिद्ध झालेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या सविस्तर अहवालाने यावर नवा प्रकाश टाकला असून तो दिलासादायक आहे. या अहवालात देशवासीयांच्या बचतीत झालेली वाढ आणि त्यांच्या बचतीच्या पद्धतींमध्ये होणारे बदल यांचे सखोल विश्लेषण मांडण्यात आले आहे. बचतीतील वाढ ही अर्थव्यवस्था मजबूत होत असल्याचे निदर्शक मानावे लागेल. इतकेच नव्हे तर या अहवालानुसार भारताचा बचतीचा दर जागतिक सरासरीपेक्षा खूप पुढे गेला आहे.




